महाराष्ट्र शासन

क्रमांक: एसटीसी ३९९०[२८२७] विशि २
शिक्षण व सेवायोजन विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २ जुलै १९९०.

प्रति,

कुलसचिव,
धुळे विद्यापीठ, धुळे.

विषय : सन १९९०-९१ या शैक्षणिक वर्षापासून अध्यापक महाविद्यालये उघडण्यास परवानगी . . .

महोदय,

सन १९९०-९१ या वर्षापासून नवीन महाविद्यालये उघडण्याकरिता शासनास प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करून शिरपूर एज्युकेशन सोसायटी शिरपूर जिल्हा धुळे या संस्थेच्या १९९०-९१ पासून खाली नमूद केल्याप्रमाणे नवीन अध्यापक महाविद्यालये उघडण्याकरिता आलेल्या अर्जावर धुळे विद्यापीठ अधिनियम १९७४ च्या कलम ४३ [४] व [५] अन्वये पुढील कार्यवाही करण्याची विद्यापीठास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

| महाविद्यालयाचे ठिकाण | विद्याशाखा. |
| --- | --- |
| शिरपूर जिल्हा धुळे | अध्यापक महाविद्यालय |

२. शासनाने संलग्निकरणाकरिता वर दिलेली परवानगी ही पुढील अटींवर आ-

१] सदर महाविद्यालयास कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

. . . २

The Shirpur Education Society Shirpur
Inward No. 206
Received 9-7-90
Sign

२] शासन पत्र क्रमांक:एसटीसी २२८९/[१८८८]-विशि २, दिनांक २२.६.१९९० मध्ये खाजगी अध्यापक महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी विहि केलेली कार्यपध्दत अनुसारण्यात यावी.

३] सदर महाविद्यालयाची प्रवेश क्षमता ८० असेल व दरवर्षी प्रत्येक विद्यार्थ्यास सदर महाविद्यालये रू. २,५००/- शिक्षण शुल्क आकारतील. विद्यापीठाने घालून दिलेल्या इतर अटी व शर्तींचे सदर अध्यापक महाविद्यालयातून पालन करण्यांत यावे.

४] स्थानिक चौकशी समिती, कार्यकारी परिषद व सिनेट यांचा अहवाल विद्यापीठाकडून प्राप्त झाल्यावर कलम ४३[६] व [७] यानुसार अंतिम संलग्निकरणाचे आदेश शासनाकडून निर्गमित करण्याबाबत योग्य ती कार्यवाह केली जाईल.

पत्राची प्रत संबंधित व्यवस्थापनाकडे पाठविण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

[ शरद परब ]
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत :

१] शिक्षण संचालक [उ. शि. ], महाराष्ट्र राज्य, पुणे.
२] प्रशासनाधिकारी [उच्च शिक्षण अनुदान],
३]

**सचिव, मिलद एज्यु. सोसायटी शिरूर जिल्हा पुणे.**

४] निवड नस्ती.

एवीके/२७१०.